**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.४१/२०१८ मधील</u>**

**<u>निशाण ११८ वरील आदेश</u>**

१.  अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

२.  दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

३.  प्रतिवादी क्र. १३ यांनी त्यांचे निशाण ११८ येथील अर्जात कथन केले आहे की, त्यांना या कामी कैफियत देण्याची आहे. दिनांक ९/८/२०१९ रोजी त्यांचे विरुध्द विनाकैफियत असा आदेश झालेला आहे. या कामी हजर झाल्यानंतर चौकशीच्या दरम्यान दावा मिळकतींबाबत वादी व प्रतिवादी यांच्या देवरुख येथील वडिलोपार्जित मिळकतींबाबतच्या कोर्ट प्रकरणांचा संदर्भ आल्याने सदर प्रकरणांच्या सहीसूद नक्कला व आवश्यक कागदपत्र मुदतीत उपलब्ध न झाल्याने त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यांनी कोणताही हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला नाही. त्यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची प्रामाणिक इच्छा आहे व त्यांची कैफियत रेकॉर्डवर न आल्यास त्यांची पैशात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.१३  यांचा प्रस्तूत अर्ज आहे.

४.  सदर अर्जावर वादीने म्हणणे देऊन कथन केले की, प्रस्तूत अर्ज खोटा, खोडसाळ व वेळकाढूपणाचा असल्याने तसेच देवरुख येथील मिळकतींचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसल्याने विलंबात नमूद कारण खोटे व खोडसाळ आहे व त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा आणि वादीस खर्च मिळावा.

५.  प्रतिवादी यांना दिनांक १७/१०/२०१८ रोजी समन्स बजावणी झाली आहे. सदर कामी प्रतिवादी यांचे विरुध्द दिनांक ९/८/२०१९ रोजी विना कैफियत आदेश झाला आहे. त्यानंतर सुमारे ८ महिन्यांच्या विलंबाने म्हणजेच दिनांक ३०/८/२०१९ रोजी प्रस्तूत अर्ज दिला आहे. प्रस्तूत दावा अद्याप तजवीज बोर्डावर प्रलंबित आहे व चौकशीला आलेला नाही.  वादातील मुद्दयाचे एकाच वेळी गुणदोषांवर निराकरण होण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजूर करणे उचीत ठरणार आहे. तसे न झाल्यास नवीन प्रकरण निर्माण होण्याची

शक्यता नाकारता येणार नाही. विलंबाबाबत वादीला नुकसान भरपाईसाठी खर्च अदा करण्याचा आदेश प्रतिवादी यांना देता येईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.१३ यांचा निशाण ११८ येथील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१३ यांनी वादी यांस पुढील तारखेस रक्कम रुपये २००/– खर्च अदा करणेच्या अटीवर त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येत आहे.

**दिनांकः २०/१२/२०१९**
**ठिकाणः लांजा.**

**(जी.एम.साधले)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्त.,लांजा,**
**जि.रत्नागिरी.**